नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २२ | Issue - 22 | वार रविवार दि. ८ जून २०२५ | Blow- Sunday Date 8 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक चोरली

## राहुल गांधींचा गंभीर आरोप; निवडणुकीत गडबड करण्याचे पाच टप्पे सांगितले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी ही निवडणूक चोरल्याचा दावा केला आहे. ही निवडणूक २०२४ च्या निवडणुकांसाठीची ब्लूप्रिंट असल्याचंही ते म्हणाले. निवडणुकीत गडबड करण्याचे पाच टप्पे त्यांनी सांगितले. यात निवडणूक आयोगाच्या नियुक्तीत फेरफार करणे, बनावट मतदार जोडणे, मतदारांची संख्या वाढवणे, बोगस मतदान करणे आणि पुरावे लपवणे यांचा समावेश आहे.

राहुल गांधी म्हणाले, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक चोरली गेली. त्यांच्या मते, भाजपने निवडणुकीत हेराफेरी केली. हेराफेरी म्हणजे मॅच फिक्सिंगसारखे आहे. फसवणूक करणारा पक्ष जिंकू शकतो. पण यामुळे संस्थांचे नुकसान होते. लोकांचा निकालावरील विश्वास उडतो.

राहुल गांधींनी निवडणूक चोरीचे सांगितलेले पाच टप्पे

– पायरी १: निवडणूक आयोगाची नियुक्ती करण्यासाठी पॅनेलमध्ये फेरफार करणे. याचा अर्थ, निवडणूक आयोगात आपल्या मर्जीतील लोक नेमणे. – पायरी २: यादीत बनावट मतदार जोडणे. म्हणजे खोटे मतदार तयार करणे. – पायरी ३: मतदारांची संख्या वाढवणे. मतदारांची संख्या वाढवून गडबड करणे. – पायरी ४: इगझ ला जिंकण्यासाठी आवश्यक असलेल्या ठिकाणी बोगस मतदानाला लक्ष्य करणे. जिथे इगझ कमजोर आहे, तिथे खोटं मतदान करणे. – पायरी ५: पुरावे लपवणे. निवडणुकीतील गडबडीचे पुरावे नष्ट करणे.




राहुल गांधी पुढे म्हणाले, महाराष्ट्रात भाजप इतका हताश का होता हे समजणे कठीण नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार, हेराफेरी ही मॅच फिक्सिंगसारखी आहे. फसवणूक करणारा पक्ष जिंकू शकतो, पण संस्थांचे नुकसान होते. लोकांचा निकालावरील विश्वास उडतो. सर्व संबंधित भारतीयांनी पुरावे पाहिले पाहिजेत. स्वतःच न्याय करा, उत्तरे मागा. कारण महाराष्ट्रातील मॅच फिक्सिंग पुढे बिहारमध्ये येईल आणि नंतर जिथे इगझ हरत असेल तिथे येईल. मॅच फिक्स निवडणुका कोणत्याही लोकशाहीसाठी विष आहेत, असं राहुल गांधींनी म्हटलं आहे.

हा मुद्दा आम्ही अनेकवेळा उपस्थित केलेला आहे. लोकसभेमध्येही राहुल गांधी यांनी हा प्रश्न आपल्या भाषणात उपस्थित केलाय. एकदम मताची संख्या वाढली, टक्केवारी वाढायला मुळात मतदारयादीत नाव आलं पाहिजे. खोट्या नावांची यादी आम्ही निवडणूक आयोगाला दिली आणि रद्द करायला सांगितली. पण हे काही झालं नाही. बोगस नावे तीनवेळा नोंदवली गेली. त्यामुळे एक जणाने तीन-तीन वेळा मतदान करता आलं. निवडणूक आयोगाची जबाबदारी होती की ही नावे हटवायला पाहिजे होतीत, असं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हणत निवडणूक आयोगावर निशाणा साधला.

# निवडणुकीदरम्यान अथक आणि पारदर्शकपणे काम करणाऱ्या लाखो निवडणूक अधिकाऱ्यांचे मनोधैर्य खचवणारे

## राहुल गांधींच्या गंभीर आरोपांवर निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र निवडणुकीबद्दल ट्विट करत पुन्हा गंभीर आरोप केले. 'महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक चोरली गेली,' असा मोठा दावा गांधीनी केला. यानंतर आता निवडणूक आयोगाने यावर प्रत्युत्तर दिले आहे. निवडणूक आयोगाने अतिशय भावनिक पद्धतीने राहुल गांधींच्या आरोपांवर स्पष्टीकरण दिले. महाराष्ट्राच्या मतदार यादीबाबत केले जाणारे आरोप हे कायद्याचा अपमान असल्याचे निवडणूक आयोगाने नमूद केले आहे.

निवडणूक आयोगाने म्हटले की, त्यांनी २४ डिसेंबर २०२४ ला काँग्रेस पक्षाला उत्तर दिले होते. ते उत्तर निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, आम्ही मांडलेल्या तथ्यांकडे वारंवार दुर्लक्ष केले जात आहे आणि तेच मुद्दे पुन्हा उपस्थित केले जात आहेत, असे दिसून येते.


आयोगाने पुढे असेही म्हटले की, कोणीही खोटी माहिती पसरवणे हे केवळ कायद्याचा अनादर करण्याचे लक्षण नाही, तर स्वतःच्या राजकीय पक्षाने नियुक्त केलेल्या हजारो प्रतिनिधींची बदनामी करणे देखील आहे. तसेच निवडणुकीदरम्यान अथक आणि पारदर्शकपणे काम करणाऱ्या लाखो निवडणूक अधिकाऱ्यांचे मनोधैर्य खचवणारे आहे. 'मतदारांद्वारे कोणत्याही प्रतिकूल निर्णयानंतर, निवडणूक आयोगाला असे समजून बदनाम करण्याचा प्रयत्न करणे की ही तडजोड झाली आहे, हे पूर्णपणे मूर्खपणाचे आहे. याचा अर्थ असा होतो की, पराभवानंतर निवडणूक आयोगावर आक्षेप घेणे चुकीचे आहे. निवडणूक आयोगाचे कर्मचारी खूप मेहनत करतात आणि त्यांच्यावर शंका घेणे योग्य नाही.'असेही आयोगाने नमूद केले. तर आयोगाचे असेही म्हणणे आहे की, निवडणूक पराभूत झाल्यानंतर काही लोक निवडणूक आयोगावर खोटे आरोप करतात. हे चुकीचे आहे आणि त्यामुळे निवडणूक आयोगाची प्रतिमा मलिन होते. निवडणूक आयोगाने आधीच सर्व आरोपांना उत्तर दिले आहे आणि ते वेबसाइटवर देखील टाकले आहे.

# गोदावरीत ६ मुले बुडाली, नदीबाहेर कुटुंबीयांचा आक्रोश

## पोलिसांकडून उशिरापर्यंत शोधमोहीम

गडचिरोली : जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या तेलंगणाच्या हद्दीतील मेडीगड्डा धरणाजवळ असलेल्या गोदावरी नदीच्यापात्रात सहा मुलं बुडाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. महाराष्ट्राचा शेवटचा तालुका सिरोंचा तालुक्याच्या सीमेवरून गोदावरी नदी वाहते. दोन राज्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या या नदीच्या पलीकडे तेलंगणाच्या हद्दीत मेडीगड्डा धरणाजवळ असलेल्या गोदावरी नदीच्या पात्रात आंघोळीसाठी आज संध्याकाळी गेलेली ६ मुलं बुडाली आहेत. अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही, रात्री उशिरापर्यंत शोध मोहीम सुरू होती. मात्र, ही मुले अद्यापही सापडली नाहीत. घटनेची माहिती मिळताच मुलांच्या कुटुंबातील सदस्यांनी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. तेलंगणा पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून मच्छीमारांची मदत घेऊन तेलंगणा पोलिसांकडून बुडालेल्या मुलांचा शोध घेतला जात आहे. शोधमोहीम राबविण्यात येत असून उद्या सकाळपर्यंत या संदर्भात सर्वोतोपरी माहिती निष्पन्न होण्याची शक्यता आहे. दरम्यान या दुर्घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी नदीकिनारी धाव घेतली असून आक्रोश पाहून अनेकांचे डोळे पाणावले. सध्या पावसाळा सुरू झाल्याने नद्यांना मोठं पाणी आलं असून नद्या भरुन वाहत आहेत. गोदावरी नदीला वाहतं पाणी असल्याने या पाण्यात मुले वाहून गेल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. दरम्यान, उद्या सकाळी पुन्हा शोधमोहिम सुरू केली जाईल.

# बाबा सिद्दिकी हत्या प्रकरण; फरार आरोपी झीशान अख्तर कॅनडा पोलिसांच्या ताब्यात, मुंबईत आणण्यासाठी प्रयत्न सुरु



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्याप्रकरणातीलफरार असलेल्या आरोपी झिशान अख्तर संदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणातील आरोपी झिशान अख्तर उर्फ जस्सी पुरेवाल याला कॅनडातील सरे पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणातला फरार असलेला मुख्य आरोपी झिशान अख्तर कॅनडात सापडल्याची माहिती. सूत्रांच्या माहितीनुसार झिशान अख्तरला कॅनडा पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. बनावट पासपोर्टच्या आधारे झिशान कॅनडात पोहचला होता अशी सूत्रांची माहिती आहे. मुंबई पोलीस झिशान अख्तरला ताब्यात घेण्याची माहिती वरिष्ठ पातळीवर घेत आहेत.बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात फरार असलेल्या महत्वाच्या आरोपींपैकी एक आरोपी म्हणून पोलीस झिशान अख्तरचा शोध घेत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या १२ ऑक्टोबर २०२४ ला करण्यात आली होती. झिशान सिद्दिकी याच्या कार्यालयाबाहेर रात्रीच्या वेळी बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता. लॉरेन्स बिश्नोई टोळीकडून बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारी स्वीकारली होती. अभिनेता सलमान खानचे निकटवर्तीय असल्यानं त्यांच्यावर गोळीबार केल्याचा दावा बिश्नोई टोळीकडून करण्यात आला होता.

**जेपी नड्डा यांनी घेतला समाचार** | **आरोपावरून राजकारण तापले**

# निवडणुकीतील 'फिक्सिंग'च्या आरोपावरुन भाजपने राहुल गांधींना चौफेर घेरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'महाराष्ट्र विधानसभा निवडणूक चोरली गेली,' असा गंभीर आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. राहुल गांधींनी म्हटले की, 'भाजपने निवडणुकीत हेराफेरी केली. हेराफेरी म्हणजे मॅच फिक्सिंगसारखे आहे.' यावरुन आता राजकीय वातावरण तापल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपचे नेते तसेच मंत्री राहुल गांधींवर पलटवार करत आहेत. राहुल गांधी सत्य जाणून घेण्याऐवजी, ते विचित्र कट रचतात आणि हेराफेरीचे आरोप करतात. पण 'लोकशाहीत सत्याची गरज आहे, नाटकाची नाही.' अशा शब्दांत राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी समाचार घेतला.

जे पी नड्डा यांनी 'एक्स'वर लिहिले की, राहुल गांधी महाराष्ट्राबद्दल खोटे बोलत आहेत . ते एका विशिष्ट पद्धतीने काम करतात. प्रथमतः, त्यांच्यामुळे काँग्रेस पक्ष निवडणुका हरतो. नंतर, सत्य जाणून घेण्याऐवजी, ते विचित्र कट रचतात आणि हेराफेरीचे आरोप करतात. ते तथ्य आणि आकडेवारीकडे दुर्लक्ष करतात. पुराव्याविना संस्थांची बदनामी करतात. त्यांना तथ्यांपेक्षा जास्त बातमीच्या हेडिंगमध्ये मध्ये रमायचे आहे.



जेपी नड्डा असेही नमूद केले की, वारंवार पकडल्यानंतरही ते निर्लज्जपणे खोटे पसरवत आहेत. कारण त्यांना बिहारमध्ये पराभव होण्याची भीती वाटते. 'लोकशाहीला सत्याची गरज आहे, नाटकाची नाही,' 'राहुल गांधी पराभवाच्या भीतीने हे करत आहेत.'

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीही गांधींच्या आरोपांचा समाचार घेतला. 'जोपर्यंत राहुल गांधी जमिनीवर येऊन वस्तुस्थिती समजून घेत नाहीत, लोकांना खोटे बोलत नाहीत आणि स्वतःला आणि त्यांच्या पक्षाला खोट्या आशा देत नाहीत, तोपर्यंत त्यांचा पक्ष कधीही जिंकू शकत नाही.' अशा खोचक शब्दांत फडणवीसांनी समाचार घेतला.

फडणवीसांनी पुढे दावा केला की, 'या आरोपांचा अर्थ असा होतो की, राहुल गांधींनी बिहारमध्ये आपला पराभव स्वीकारला आहे. ते स्वत:च्या पक्षाला खोट्या आशा देत नाहीत, तोपर्यंत त्यांचा पक्ष कधीही जिंकू शकत नाही. त्यांना आता जागे व्हावे लागेल आणि वास्तव समजून घ्यावे लागेल.' फडणवीसांनी अशीही टीका केली की, ना राहुल गांधींना ते काय बोलत आहेत हे समजते, ना लोकांना ते काय बोलत आहेत हे समजते. त्यामुळे देशातील जनता त्यांची विधाने गांभीर्याने घेत नाही.

राहुल गांधींच्या विधानावर केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनीही प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की, निवडणुकीत जनतेने अनेकवेळा नाकारले असले तरी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस पक्ष हे सत्य स्वीकारण्यास सक्षम नाहीत. प्रत्येक निवडणुकीतील पराभवानंतर निवडणूक आयोग आणि जनादेशाला कटात उभे करणे, ही राहुल गांधींची निराशा आहे.



# मेरा बुद्रुक ते मेरा फाटा रस्ता देत आहे वाहनधारकांना जिवंतपणीच मरण यातना!

## रस्त्यावर पडली मोठ मोठे खड्डे,संबंधित विभागाचे दुर्लक्ष; वाहनधारक त्रस्त!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक ते मेरा फाटा हा दीड किलोमीटर रोडचे अतोनात हाल झाले असून,हा रस्ता वाहन धारकाच्या जीवावर उठला आहे,तर अनेक वाहनधारकांना कायमचे अपंग आले असून काही दवाखान्यांमध्ये उपचार घेत आहे.या रस्त्यावरून वाहने नेने म्हणजे तारेवरची कसरतच वाहनधारकांना करावी लागत आहे. हा रस्ता जागोजागी उखडला तरी लोकप्रतिनिधी व संबंधित विभागाला लोकांचे मनके तुटत असले तरी काही सोयर सुतक दिसून येत नाही.मनुबाई,गुंजाळा, मेरा बुद्रुक येथील ग्रामस्थांना चिखली,बुलढाणा जाण्यासाठी हाच रस्ता आहे. त्यामुळे महसूल, शिक्षण, दवाखाना किंवा खरेदीसाठी जाताना याच रोडने जावे लागते. परंतु रस्ता पूर्णपणे उखडला असून, मेरा बुद्रुक ते मेरा फाटा या रस्त्यावर काही ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडून अनेक ठिकाणी रस्त्याची चाळन झाली आहे. वेळीच लोकप्रतिनिधींनी या रस्त्याबाबत आवाज उठवला नाही तर येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये त्याचे परिणाम लोकप्रतिनिधींना भोगावे लागेल असे अनेक नागरिक दबक्या आवाजात बोलताना दिसून येत आहे.





तसेच मेरा खुर्द, साखरखेर्डा या रस्त्यावर नेहमी वाहनाची रहदारी असल्याने लहान-मोठे अपघात होत असूनसंबंधित विभागाने या रस्त्याची दुरुस्तीची मागणी जोर धरत आहे, साखरखेर्डा - मेरा बुद्रुक - मेरा खुर्द हा रस्ता नेहमी वाहनाने गजबजलेला असतो.ह्या रोड वरून वाहनाची रहदारी ही जास्त असल्यामुळे दिवसातून अनेक वेळा या रस्त्यावर लहान मोठे अपघात होत असल्याने हा रस्ता वाहन धारकाच्या जीवावर उठल्याने जिवंतपणे वाहन धारकांना मरण यातना रस्त्यावरून जात असताना सोसाव्या लागत असल्याचे दिसून येत आहे. अनेक वर्षापासून साखरखेर्डा,मेरा खुर्द रस्त्या रुंदीकरणाची मागणी जोर धरत आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडले असून,तर काही ठिकाणी रस्त्याची चाळण झाली आहे.मेरा बुद्रुक फाटा येथे चौफुली असल्याने भरधाव वेगात जाणाऱ्या वाहनामुळे एखादी मोठी जीवित हानी होऊ शकते त्यामुळे सुद्धा गतिरोधकाची मागणी जोर धरत आहे.तरी संबंधित विभागाच्या मेहरबान अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष घालून ह्या रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे बुजवावे,अशी मागणी मेरा बुद्रुक,गुंजाळा,मनुबाई येथील वाहनधारका सह ग्रामस्थ करीत आहे.

मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द या रस्त्याचे झालेले अतोनात हाल बघता बुलढाणा जिल्ह्याचे केंद्रीयमंत्री व सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार ह्या रस्त्याबाबत उदासीन असल्याचे दिसत आहे.मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द रस्ता वेळीच न झाल्यास येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जनता मतदान रुपी लोकप्रतिनिधींना धडा शिकवेल.

**रामदास डोंगरदिवे (वाहनधारक मेरा बुद्रुक)**

मेरा बुद्रुक गाव ते मेरा खुर्द रस्ता हा सर्व वाहनधारकांच्या जीवावर उठला असून संबंधित विभाग व लोकप्रतिनिधींनी वेळीच लक्ष घातल्यास, मेरा बुद्रुक सह परिसरातील नागरिकांना येणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्व लोकप्रतिनिधींना धडा शिकवावा लागेल. प्रत्येक नागरिकांना या रस्त्यावर जाताना जिवंतपणेच मरण यातना सोसावा लागत आहे.तरी स्थानिक प्रतिनिधींनी,लोकप्रतिनिधी व संबंधित विभाग यांनी वेळीच लक्ष घालून ठोस उपाययोजना करतील ही अपेक्षा.

**ज्ञानेश्वर पडघान (चिखली तालुका उपाध्यक्ष काँग्रेस)**

### सिंदखेडराजा मतदारसंघापेक्षा आमचा चिखली मतदार संघच बरा होता अशी म्हणण्याची वेळ आली नागरिकांना

**बुलडाणा जिल्ह्यातील मतदार संघाच्या रचना करत असताना चिखली मतदारसंघातील २२ गावे हे सिंदखेडराजा मतदारसंघात गेले.२२ गावे त्याच्यानंतर सिंदखेड राजा मतदारसंघात असताना सध्याच्या स्थितीत मेरा बुद्रुक ते अंढेरा रस्ता,मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द रस्ता,रोहडा गाव ते रोहडा फाटा रस्ता,देऊळगाव घुबे ते शेळगाव आटोळ रस्ता या रस्त्याचे अतोनात हाल झाले असून वाहन धारकांना ह्या रस्त्यावरून जात असताना जिवंतपणेच मरण यातना सोसाव्या लागत आहे. तरी मेहेरबान संबंधित विभाग व लोक प्रतिनिधी या रस्त्याबाबत उदासीन असल्याचे दिसून येत आहे,तसेच अनेक वर्षा पासून मेरा खुर्द ते साखरखेर्डा रस्ता रुंदीकरणाच्या प्रतीक्षेत असून या रस्त्यावर वाहनाची रहदारी पाहता हा रस्ता रुंदीकरण होणे गरजेचे होते पण आजपर्यंत तसे झाले नाही.सिंदखेड राजा मतदारसंघात गेलेल्या अनेक २२ गावातील नागरिकांकडून सिंदखेड राजा मतदारसंघापेक्षा चिखली मतदारसंघात असतो तर बरे होतो अशी म्हणण्याची सध्यातरी वेळ आली आहे.**

# लोह्यात शिवसेना नांदेड दक्षिणच्या वतीने फडणवीस सरकार क्या हुआ तेरा वादा आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : लोह्यात शिवसेना उबाठा नांदेड दक्षिणच्या वतीने फडणवीस सरकार क्या हुआ तेरा वादा आंदोलन करण्यात येऊन लोहा तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, यांना निवेदन देण्यात आले.

राज्यात गेल्या अनेक महिन्यांपासून सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने राज्यातील जनतेला, लाडक्या बहिणींना, शेतकऱ्यांना भूलथापा देऊन सता काबीज केली व निवडणुक संपताच दिलेल्या आश्वासनाकडे पाठ फिरवली त्यामुळे शेतकरी, कष्टकरी, लाडक्या बहिणीसह सामान्य जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असल्याचे शिवसेना नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख पद्माकर पाटील सावंत यांनी सांगितले.

लोहा तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

पुढे निवेदनात असे नमूद केले की, मराठवाड्यातील बांधवांच्या वतीने, आपणास हे निवेदन सादर करत आहे.

### लोहा तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांना दिले निवेदन



आपल्या सरकारने मोठ्या गाजावाजाने जाहीर केलेल्या अनेक योजना आणि दिलेली आश्वासने आज केवळ कागदावरच राहिली आहेत. यामुळे शेतकरी प्रचंड निराशेच्या गर्तेत ढकलली गेली असून, अनेक मूलभूत समस्यांनी डोके वर काढले आहे. याबद्दल तीव्र संताप व्यक्त करत, खालील प्रमुख मुद्द्यांवर तात्काळ लक्ष देऊन कार्यवाही करावी, अशी मागणी करत आहे.

सत्ताधारी तिन्ही पक्षांनी शेतकऱ्यांना लगोलग कर्जमाफी देण्याचा गाजावाजा केला, तसेच वेळेत कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाचा पत्ता नाही. सरकारने सरड्याला लाजवेल इतका वेगाने रंग बदलला. कर्जमाफीच्या अपेक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक वर्ष संपत आले असताना कर्ज भरण्यासाठी सांगून अर्थमंत्री अजित पवारांनी त्यांची क्रूर थट्टा केली. याचाच परिणाम म्हणून, गेल्या सात महिन्यांत राज्यात १००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. शेतकऱ्यांच्या मार्फत राज्याच्या तिजोरीत जाणारा जीएसटी अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना परत करण्याच्या बाता मारल्या, मात्र जीएसटी अद्याप शेतकऱ्यांच्या वाट्याला आलाच नाही. सोयाबीन आणि कापसाचे भाव पाडण्यासाठी परदेशातून हे पीक आयात करण्याचे फतवे काढले जात आहेत. शेतकरी सन्मान योजनेची रक्कम १२ हजारांवरून १५ हजार रुपये करण्याचे आश्वासन केवळ 'बाजार गप्पा' ठरले आहे. शेतमाल खराब न होण्यासाठी शीतगृहे देण्याचे बोलले, पण आज पावसाने खराब झालेल्या पिकाचे नुकसानही सरकारला उघड्या डोळ्याने दिसेनासे झाले आहे.,

हमीभावाची 'दीडपट' भूलथाप ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखी आहे. उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभावाची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्यासारखे आहे. सरकार फक्त कागदावर आकडेवारीचा खेळ करते आणि प्रत्यक्षात अन्नदात्याला वाऱ्यावर सोडून, त्याच्या जखमेवर मीठ चोळत आहे.,

'एक रुपयात पीकविमा' योजनेची घोषणा करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली. ती योजना आता बंद केली असून, विमा कंपन्यांनी दीड लाख कोटींपेक्षा जास्त प्रीमियम गोळा करून ५० हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम स्वतःच्या खिशात घातली आहे. मात्र, शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई सोडाच, साधे पंचनामेही झालेले नाहीत. ४५ हजार गावांमध्ये पाणंद रस्ते देण्याची घोषणा केवळ कागदावरच राहिली. शेतकऱ्यांचे हाल अजूनही तसेच आहेत, कारण आश्वासनांची पूर्तता कधी होणार हे कुणालाच माहित नाही. अन्नदाता बनेल ऊर्जादाता ही योजना केवळ एक निव्वळ धूळफेक आहे. आजही अनेक शेतकरी लोडशेडिंगने त्रस्त आहेत. सबसिडीचे आकडे मोठे असले तरी ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही, आणि 'ऊर्जादाता' बनण्याऐवजी 'अन्नदाता' आजही अंधारातच आहे. 'हर घर जल, हर घर छत' या योजनांच्या माध्यमातून मोठी स्वप्ने दाखवली खरी, पण अंमलबजावणीतील त्रुटी, भ्रष्टाचार आणि दिरंगाईमुळे जनतेची घोर निराशा झाली आहे. घोषणा करून दिशाभूल करण्याऐवजी, सरकारने या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अन्यथा हे केवळ 'जुमले' ठरतील अशी भीती व्यक्त होत आहे.,

मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाची उपेक्षा हे या सरकारचे एक मोठे अपयश आहे. २०१८ पासून ४० ते ४५ हजार कोटींचा हा प्रकल्प केवळ कागदावरच रेंगाळत आहे, तर मराठवाडा आजही टँकरच्या पाण्यावरच तग धरून आहे. निधीचा अभाव, राजकीय इच्छाशक्तीची कमतरता आणि अंमलबजावणीतील दिरंगाई यामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प केवळ घोषणांचा पाऊस ठरला असून, मराठवाड्याची तहान कायम आहे., असे नमूद केले.यावेळी शिवसेना शिवसेना नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख पद्माकर पाटील सावंत, युवासेनेचे लोहा -कंधार विधानसभा प्रमुख बालाजी गाडेकर, जेष्ठ शिवसैनिक बापुराव पाटील अटकोरे, प्रल्हाद कदम,अगंद उमरेकर, यांच्यासहित मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ११३ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा**

**बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २९ मे १९२९ ला धर्मांतराची नोटीस दिली होती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३० मे ते १ जून १९३६ दरम्यान संपन्न झालेल्या मुंबई येथील महार इलाखा परिषदेत केलेल्या मुक्ती कोन पथे? या विधानाच्या ८९ व्या वर्धापनानिमित्त ११३ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा १ जून २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, १३ ऑक्टोबर १९३५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मातराची घोषणा केली असली तरी २९ मे १९२९ ला बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा या गांवी धर्मांतराची नोटीस दिली होती. आपल्या समाजाची साखळी निर्माण होऊ नये, म्हणून तर सर्व क्षेत्रात खाजगीकरण लागू केले जात आहे. सामान्य माणसाला आपल्या विकासासाठी किमान सामान्य ज्ञानाची पातळी गाठली पाहिजे. आपल्या माणसांना व्यवसायात उतरायचे, असेल तर लेखक जी. एच. धबाले यांचे बिझिनेस माईंड अर्थात व्यावसायिक मन हे पुस्तक समजून घेतले पाहिजे.

अखिल मुंबई इलाखा महार परिषद हैदराबादी आंबेडकर बी. एस. व्यंकटराव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली होती. सदरील परिषदेच्या सभा स्थानास रमाबाई आंबेडकर नगर तर त्या काळात महाड व नाशिकला मोठी आंदोलने झाली असल्याची जाणीव ठेवून दरवाज्यांना 'नाशिक दरवाजा' व 'महाड दरवाजा' अशी नांवे देण्यात आली होती. सभामंडपात १८ प्रकारच्या उद्बोधक संदेशाचे फलक लावण्यात आले होते. याचे भान ठेवून वर्तमानातील आयोजकांनी सभा, संमेलनातील आपल्या सभामंडपात तशा प्रकारच्या फलक व प्रतिमा दृश्य स्वरूपात प्रस्तुत केल्या पाहिजेत. स्पृश्य अस्पृश्यातील वर्ग कलह यासारख्या गंभीर समस्यांचे निराकरण करता यावे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुक्ती कोण पथे? या सदराखाली सदरील परिषदेत विस्तृत मार्गदर्शन केले आहे. करिता सदरील विधानाच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान प्रासंगिकता समजून घेण्यासाठी आपण चर्चा करीत आहोत.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना एड. सिद्धार्थ पाईकराव म्हणाले की, १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला मुक्कामी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेनंतर जनतेचे जनमत जाणून घेण्यासाठी मुंबई महार इलाखा परिषद आयोजित करण्यात आली होती. धर्मांतर का करायचे? हे जाणून घेतल्यानंतरच इतरजण आपला सहभाग नोंदविण्याची शक्यता होती. महाडचा सत्याग्रह हा केवळ पाण्यासाठी संघर्ष नव्हता, तर स्पृश्यांकडून अस्पृश्यांशी केल्या जाणाऱ्या भेदभाव पूर्ण व्यवहारातून आपल्याशी समतेचा व्यवहार केला जात नसल्याचे सिद्ध करायचे होते. त्या परिषदेत आम्ही सर्व जण धर्मांतरास तयार आहोत असा ठराव मंजूर करण्यात आला होता. कारण माणूस धर्मा करिता नसून धर्म माणसाकरिता असतो. याची पूर्तता व्हायला हवी होती.



प्रमुख वक्ते म्हणून बोलताना सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मिलिंद आठवले म्हणाले की, ज्या धर्मात निसर्गदत्त, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय हक्क प्राप्त होत नसलेल्या धर्मात का राहावे? माणसाला माणूसपणाचे अधिकार मिळत नसतील तर तो धर्म झिडकारून बाहेर पडले पाहिजे. ज्यात आपणासमोर असलेल्या अनेक समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी मुक्ती कोण पथे? मध्ये विवेचन करण्यात आले होते. बुद्धाचा धर्म वैज्ञानिक असल्याने आपण तिकडे वळले पाहिजे.

याप्रसंगी विलास कटारे म्हणाले की, सिद्धार्थ व मिलिंद यासारखे उद्घाटक व प्रमुख वक्ते लाभणे हा योगायोग आहे. ज्या काळात स्वतंत्र मजूर पक्षातून १६ आमदार विधानसभेवर पाठविल्या गेले तो सुवर्ण काळ होता. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा कुठल्याही व्यक्तीच्या विरोधात नव्हता तर विषमतामय विचार कृतीच्या विरोधात होता. आर्यांनी द्रविड लोकांवर आक्रमण करून धर्म व जातीव्यवस्था लादली होती. परिणामी जिनाविरहीत इमारत जन्माला आली. सामाजिक विकासासाठी प्रशासनात स्वतःच्या समाजाची साखळी निर्माण केली पाहिजे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, आपल्या समाजात खेकड्याची चालयुक्त चैन मजबूत असल्याने आपली साखळी निर्माण होऊ शकली नाही. प्रतिकुल परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सभा, संमेलने, परिषदा घेतल्या आहेत. आपण मात्र आता दिशाहीन झालो आहोत. गोविंद कांबळे म्हणाले की, १९६० ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यापूर्वी आम्ही मुंबई इलाख्यात होतो. अशोक मेश्राम म्हणाले की, आपणांस सहजासहजी धम्म मिळाला नाही. सम्राट अशोकांनी आपल्या अपत्यांना परदेशात धम्म प्रसारासाठी पाठविले होते. गृहत्याग करून ज्ञान प्राप्तीनंतर बुद्धांनी लाखो लोकांना धम्म समजावून सांगितला तर मग अनुयायी म्हणून शेजाऱ्यांना तरी आपण धम्म समजावून सांगतो काय? प्रास्ताविक एड. राजू बागूल तर सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. गोविंद कांबळे यांनी 'तुझीच कमाई, आहे गं भिमाई' हे गीत सादर केले. या कार्यशाळेला उद्योजक मिलिंद बागूल, विलास कटारे, अशोक मेश्राम, गोविंद कांबळे, एड. विलास रामटेके, साधू आनंद, एड. रत्नदीप कांबळे, प्रा. डॉ. मिलिंद आठवले, बी. बी. मेश्राम, एड. राजू बागूल, प्रा. शिवम गायकवाड इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्रा; भाविकांसाठी २७ जूनपासून २४ तास दर्शन व्यवस्था

## गहिनीनाथ महाराज औसेकर; यात्रा कालावधीत भाविकांना मुबलक सोई सुविधा, मंदिर जतन व संवर्धनाची कामे अंतिम टप्प्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी)आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. या आषाढी यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना मंदिर समिती मार्फत मुबलक सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच भाविकांचे सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी दि. २७ जून पासून २४ तास दर्शन व्यवस्था उपलब्ध होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीची बैठक सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली. सदर बैठकीस मंदिर समितीचे सदस्य शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच पुरातत्व विभागाचे रामेश्वर निपाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास गुजरे, सर्व खाते प्रमुख, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे व जतन - संवर्धनाचे ठेकेदार उपस्थित होते.

शुद्ध आषाढी एकादशी दि. ०६ जुलै रोजी आहे. यात्रेचा कालावधी दि.२६ जून ते दि.१० जुलै असा आहे. शासकीय महापूजा २.२० वाजता मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य व मानाचे वारकरी यांचे शुभहस्ते सपत्नीक श्रीची शासकीय महापुजा केली जाणार आहे. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन आराखड्यांचा कामाचा आढावा घेण्यात आला, या यात्रेच्या

### टोकन दर्शन प्रणालीची १५ जूनला प्रथम चाचणी

पार्श्वभूमीवर मंदिर जतन व संवर्धनाची सध्या सुरू असलेली सर्व कामे अंतिम टप्प्यात असून, टोकन दर्शन प्रणालीची दिनांक १५ जून रोजी पहिली चाचणी घेण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

तसेच आषाढी यात्रेत भाविकांना सुलभ व जलद दर्शन उपलब्ध करून देण्यावर मंदिर समितीचा भर राहणार असून, दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून वॉटरप्रुफ मंडप, ४+६ पत्राशेड, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, लाईव्ह दर्शन, कुलर फॅन, सार्वजनिक सूचना प्रणाली, मिनरल वॉटर, सुरक्षा रक्षक नियुक्ती, आपत्कालिन सुविधा, चहा खिचडी वाटप, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल, २४ तास अन्नछत्र, बँग स्कॅनर मशिन, हिरकणी कक्ष, नदीपात्रात चेंजिंग रूम इत्यादी स्वरूपाच्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्याबाबतची सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

प्रतिवर्षीप्रमाणे विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देणे, टोकण दर्शनाची चाचणी घेणे इत्यादी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे राज्याचे मुख्यमंत्री महोदय मा देवेंद्रजी फडणवीस यांना दिनांक १६ किंवा १७ जून रोजी मंदिर समितीच्या वतीने निमंत्रण देण्यात येणार आहे. असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.




त्याचबरोबर चंदनउटी पुजेची दि. १३ जून रोजी सांगता पुजा होणार असून, श्री विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची चंदनउटी पुजा अनुक्रमे सदस्या ड माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या शुभहस्ते संपन्न होत आहे.

यावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना शनिरत्न व मानवसेवा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात आला.

---

# शेटफळच्या लेझीम संघाच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शेटफळ तालुका करमाळा दुर्गराज रायगडावर झालेल्या ३५१ या राज्याभिषेक सोहळ्यात शेटफळ तालुका करमाळा येथील नागनाथ लेझीम संघाने सहभागी होऊन उत्कृष्ट लेझीम सादरीकरण केल्याबद्दल त्या लेझीम संघाला सन्मानचिन्ह देऊन युवराज संभाजी छत्रपती महाराज व महाराणी संयोगिता राजे महाराज यांच्या हस्ते वर्ष पत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

शिवराज्याभिषेक सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील प्राचीन कला संस्कृती जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या विविध लोक कलावंत कलाकार शाहीर गोंधळी वासुदेव आपापली कला सादर करतात शेटफळ येथील नागनाथ लेझीम संघाने प्राचीन लेझीम कला जतन केले असून पारंपारिक हलगीच्या ठेक्यावर होत असलेल्या या लेझीम कलेचे सर्वत्र कौतुक केले जात आहे शेटफळ करांनी जपलेली ही पुरातन लेझीम परंपरा कला पाहून युवराज संभाजी राजांनी कौतुक करत भर पावसात या पथकातील तरुणा बरोबर नेहमीचा ठेका धरला.

सोलापूर जिल्ह्यातील शेटफळ तालुका करमाळा येथील तरुणांनी प्राचीन लेझीम परंपरा जोपासलेले आहे. गावातील २०० सदस्य असलेला हा लेझीम संघ रायगड शिवराज्याभिषेक सोहळ्याला जाण्यापूर्वी १५ ते २० दिवस दररोज संध्याकाळी सराव करून या सोहळ्याला जाण्यासाठी तयारी करत असताना यावर्षी १२५ जणांची राज्याभिषेक सोहळ्यात लेझीम सादरीकरण सहभाग नोंदवला राज्याभिषेक सोहळ्यानंतर होळीच्या माळावर युवराज संभाजी राजे व प्रमुख मान्यवरांच्या समोर भर पावसात लेझीम संघाने उत्कृष्ट सादरीकरण केले व या सादरीकरण बद्दल या संघाला गौरवण्यात आले आहे. राज्याभिषेक सोहळ्यासाठी गेलेल्या शेटफळ येथील लेझीम पथकातील तरुणांनी केवळ नेहमीचे सादरीकरण केले नाही तर या ठिकाणी दोन दिवस स्वयंसेवक म्हणून किल्ल्यावर येणारे शिवभक्तांची गर्दी नियंत्रणाचे स्वयंसेवक म्हणून काम केले पाहिले तर येताना गडावर कार्यक्रमाच्या वेळी झालेला कचरा व प्लॅस्टिक यांची स्वच्छता केली.

# मैंदर्गीत दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट(तालुका प्रतिनिधी) दि १९-अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील नागरिक दूषित पाण्याच्या गंभीर समस्येशी झुंज देत आहेत.सामान्य नागरिकांना निधान पिण्यासाठी शुध्द पाणी तरी देण्यात यावे.अशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ता इस्माईल आळंद यांनी नगर परिषद चे मुख्याधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

### त्वरित कार्यवाही साठी इस्माईल आळंद यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

पावसामुळे घरातील नळातून गटाराचे पाणी येत असून, पाण्याचा रंग काळसर आणि फेसयुक्त असतो. हे पाणी दोन ठिकाणी असलेल्या खड्ड्यांमधून गळत असल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.दूषित पाण्यामुळे गंभीर आजार पसरण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. इस्माईल आळंद यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे संबंधित अधिकार्यांवर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. त्यांनी पाण्याच्या पाईपलाईनमधील खड्डे तातडीने बुजवून नादुरुस्त नळ पाईप दुरुस्त करण्याची विनंती केली आहे. जर या समस्येवर तातडीने तोडगा काढला नाही, तर ते स्वतः दूषित पाण्याचे भांडे घेऊन कार्यालयावर निदर्शन करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



मैंदर्गीतील नागरिकांच्या या गंभीर समस्येकडे नगरपरिषदेने गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना करणे उचित वाटत आहे.

---

## निफाड मोरे महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनी साजरा

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे उक्तीचे आचरण ही काळाची गरज : प्रा. डॉ. ढगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विकास हा मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी आवश्यक असतो परंतु आपण ज्या पर्यावरणाच्या पायावर उभे आहोत त्याला बाधा होता कामा नये. वाढते औद्योगीकरण, बांधकामे,विविध शस्त्रास्त्रे चाचण्या, घरात दैनंदिन होणारा वाढता रासायनिक वस्तूंचा व प्लास्टिकचा वापर यामधून पर्यावरणावर विपरीत परिणाम होत पृथ्वीवर आपल्या नंतर मानवाच्या १०० पिढ्या आनंदाने नांदू शकतील असं वातावरण सांभाळणे ही आपल्या पिढीची महत्त्वाची जबाबदारी आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे यांनी केले.



मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालय येथे आयोजित वृक्षारोपण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. योगेश कडलग,प्रा. अभय वडघुले, प्रा. सुनील जाधव, प्रा.शंकर गायकवाड,श्रीमती सविता कापसे, शामल कुशारे, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका रा.से.यो. आणि एन.सि.सी. चे विद्यार्थी आदी उपस्थित होते.

पुढे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे म्हणाले की, निफाड महाविद्यालयात एक मूल तीस झाडे अभियान,घरच्या घरी रोपवाटिका घरोघरी रोपवाटिका,माझा वाढदिवस माझे झाड, आईच्या नावे एक झाड, नो प्लास्टिक आदी उपक्रम राबविले जात आहेत. महाविद्यालयात १०,००० रोपांची रोपवाटिका तयार करण्याचे काम सुरू केलेले असून सर्व प्राध्यापक, सेवक व विद्यार्थ्यांनी यामध्ये कृतीयुक्त सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धन करण्यास हातभार लावत आहेत.

याप्रंगी महाविद्यालयीन आवारात वृक्षारोपण करण्यात आले. आणि पर्यावरण रक्षण व संवर्धन करणे विषयी सर्वांनी सामूहिक शपथ घेतली.

या कामी महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मा.दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात कोकणातील प्रतिभावंत शाहिरांची जुगलबंदी

**लोककलेच्या व्यासपीठावर, नवी वैचारिक शिकवणींची पर्वणी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : कोकणातील पारंपरिक लोककला होळी आणि गणेशोत्सव हे कोकणातील खरे खुरे उत्सव.या दोन्ही उत्सवासाठी येथील शेतकरी मोकळा असतो.भाताची लावणी संपली की घरोघरी गणपती येतात आणि भाताची कापणी /मळणी संपताच शिमग्याचे म्हणजेच होळीचे वेध लागतात.कोकणातील या दोन्ही सणांशी येथील लोककला निगडीत आहेत.

शक्ती-तुरा (जाखडी) हा सामूहिक नृत्याचा प्रकार आहे. गणेशोत्सवात गावतल्या प्रत्येक वाडीत जाखडीचा संच असतो.

### श्री पाणबुडी देवी कलामंच (मुंबई) तर्फे आयोजन

आठ गडी फेर धरून वादकांच्या भोवती नाचतात.ढोलकी आणि घुंगरू ही पारंपरिक वाद्य आणि आधुनिक ढंगाची गाणी यांचा मेळ जाखडीत असतो.जाखडीत आता अनेक बदल झालेत. वेशभूषा,प्रकाश योजना,संगीत आणि वाद्यवृंद यांनी सध्याची जाखडी वेगवान आणि रंगीतसंगीत बनली आहे.आता जाखडीचा जंगी सामना जणू प्रेक्षकांसाठी पर्वणी असते.

कोकणातील लोककला हीच जतन करण्यासाठी आणि रसिक मनोरंजनासाठी रायगड - रत्नागिरी असा दिग्गज शाहिरांचा जंगी मुकाबला होणार आहे.यामध्ये शक्तीवाले शाहीर प्रभाकर धोपट यांच्याविरुद्ध तुरेवाले शाहिर ज्ञानदीप भोईनकर शक्ती-तुरा रसिकांचे मनोरंजन करणार आहेत. रसिक हो आपली उपस्थिती अनमोल असून हा सामना मंगळवार दि.१५ जुलै २०२५, रोजी रात्रौ ८.३० वा.मा. दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विले पार्ले, पूर्व ( मुंबई ) येथे होणार आहे.या सामन्याचे आयोजन श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) यांनी केले असून अधिक माहितीसाठी किंवा तिकीटसाठी ९९३०५८५१५३ / ९८३३६८९६४२ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

---

**येवला ते नाशिक बसने संशयित महीलांचा चोरी च्या इराद्याने सुरू होता प्रवास**

**प्रवास करत असतांना निफाड बस स्थानकात केली अटक**

# प्रवासा दरम्यान चोरी करणाऱ्या महिला निफाड पोलिसांच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : येवला ते नाशिक या बसमधून पाच ते सहा संशयित महिला (वय अंदाजे ३५ ते ४०)या आपल्या लहान बाळांना सोबत घेऊन चोरीच्या उद्देशाने निफाड कडे येत असल्याची गुप्त खबर्यामार्फत निफाड पोलिसांना माहिती मिळताच पीआय गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली निफाड पोलिसांनी, निफाड बस स्थानकात सापळा लावण्यात आला होता , सदर गाडी सकाळी ११वा, च्या दरम्यान निफाड बस स्थानकात आली असता गाडीमधील संशयित महिलांची कसून चौकशी केली,. महिलांनी उडवा उडवीची उत्तरे दिल्याने या महिला निफाड पोलिसांच्या जाळ्यात सापडल्या.

सदर संशयित महिलांनी दि. २४/५/२०२५ रोजी नाशिक ते संभाजीनगर चे बसने प्रवास करत असतांना औरंगाबाद नाका ते चांदोरी चौफुली दरम्यान २ ते ३ च्या दरम्यान येवला येथील एका फिर्यादी महिलेच्या कपड्याचे बॅगमधून एक सोन्याचे गंठण, पोत, अंदाजे ६०००० रुपये किमतीचे सोने चोरी केले ,असून सायखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९८/२५ कलम ३०३ (२) इछड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तसेच सदर संशयित महिलांनी मालेगाव ते अहिल्यानगरप्रवासादरम्यान दिनांक १९/४/२०२५ रोजी सावरगाव शिवार ता. येवला दरम्यान १५००००रू कीमतीचे ३ तोळे वजनाची सोन्याची पोत व१०,००० रुपये किमतीचे दहा भार वाजनाचे चांदीचे ब्रेसलेट ची चोरी केली होती, सदर घटनेची नोंद येवला शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १५९/२५ कलम ३०३(२)इछडनोद करण्यात आली होती, सायखेडा व येवला येथील या फिर्यादी महिलांना निफाड पोलीस ठाण्यात बोलविण्यात आले होते फिर्यादी महिलांनी या संशयित महिलांना ओळखले असून याच महिलांनी आमची सोने चोरी केल्याची कबुली दिली , त्यांचा पुरवणी जबाब नोंदवून पुढील कारवाईसाठी सायखेडा व येवला पोलीस ठाण्यातील तपासी अंमलदार यांच्या ताब्यात देण्यात आले आहे, या कारवाईत पोलीस कपालेश्वर ढिकले, नितीन साळवे, धनंजय जाधव, नितीन सांगळे, संगीता जाधव, पुनम शिंदे, राजेंद्र दरोडे, यांनी भाग घेऊन सदर महिलांना पकडण्यात यश मिळविले.

**कोणत्याही प्रवासाच्या दरम्यान प्रत्येक नागरिकांनी व महिलांनी सावध राहूनच प्रवास करायला हवा आपले मौल्यवान दागिने प्रवासात घालने टाळावे, तसेच आपल्या मागे व पुढे शेजारी कोण बसलेले आहे याचा अंदाज घ्यावा, गर्दीच्या ठिकाणी नागरिकांनी व महिलांनी आपले मोबाईल, पैशाचे पॉकेट यांची काळजी घेतली पाहिजे. जर कुणाला एखाद्या व्यक्तीच्या संशयास्पद हालचाली वाटल्यास ११२ या नंबरवर फोन करून माहिती दिली पाहिजे किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क केला पाहिजे**

**- गणेश गुरव पी आय**
**निफाड पोलीस ठाणे**



# समाजसेवेच्या महासागरात नवा लाटांचा उठाव; समाज कल्याण संस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त नवी प्रांतिक कार्यकारिणी जाहीर!

## माजी आमदार रुपेश म्हात्रे प्रदेशाध्यक्ष, तर डॉ. विश्वासराव आरोटे व नारायण मामा पाटील यांची महत्वाच्या पदांवर सर्वानुमते निवड!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी/प्रतिनिधी : सामाजिक कार्यात अविरतपणे कार्यरत असलेल्या समाज कल्याण न्यास या संस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत शिर्डी येथील साईपालखी निवारा केंद्रात संस्थेचा भव्य पदाधिकारी मेळावा पार पडला. या वेळी राज्यभरातून हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी, सामाजिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या ऐतिहासिक मेळाव्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते संस्थेच्या नवीन प्रांतिक कार्यकारिणीची घोषणा. शिवसेना (शिंदे गट) नेते व भिवंडी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार रुपेश म्हात्रे यांची समाज कल्याण न्यासच्या प्रदेशाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

या वेळी पत्रकारिता आणि सामाजिक कार्यात अग्रणी भूमिका बजावणारे डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक यांची प्रदेश उपाध्यक्ष म्हणून तर अनुभवी नेतृत्वाचे प्रतीक असलेले नारायण मामा पाटील यांची प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

याशिवाय विविध जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आल्या:

मुख्य पदाधिकारी नियुक्त्या:

स्वप्निल भोईर - महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष

योगेश बेनके - महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख

संजीवन म्हात्रे - महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते

डॉ. किशोर बळीराम पाटील - प्रदेश कार्यकारिणी सदस्य

सुधीर जावळे - उत्तर महाराष्ट्र शिक्षक सेना अध्यक्ष

संजय फुलसुंदर - उत्तर महाराष्ट्र शिक्षक सेना सचिव

डॉ. मनिलाल शिंपी - उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख

शंकर खारीक - कोकण विभाग प्रदेश अध्यक्ष

जिल्हा व तालुका पातळीवरील पदाधिकारी:

ज्ञानेश्वर भोईर - ठाणे जिल्हा अध्यक्ष

विलास भोईर - ठाणे जिल्हा सचिव, शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष

प्रकाश देवळीकर - पालघर जिल्हा अध्यक्ष

मूलचंद भगत - नाशिक जिल्हा अध्यक्ष

फारुख शेख - बीड जिल्हा अध्यक्ष

समाधान पाटील - धुळे जिल्हा अध्यक्ष

महिला आघाडी पदाधिकारी:

सौ. नलिनी चौधरी - ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा

सौ. गायत्री महिंद्र पगार - नाशिक जिल्हा महिला अध्यक्षा

एड. शुभांगी निचिते - ठाणे महिला कार्याध्यक्ष

सौ. स्वाती कांबळे - भिवंडी शहर महिला जिल्हाध्यक्ष

सौ. नलिनीताई घरत - ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष

सौ. अंजलीताई चौधरी - पालघर जिल्हा महिला अध्यक्ष

या भव्य मेळाव्याचे अध्यक्षस्थान हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांनी भूषवले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, या संस्थेमधील पदे ही वैयक्तिक प्रतिष्ठेसाठी नव्हे, तर समाजाच्या सेवेचा संकल्प घेण्यासाठी आहेत. पदे लग्नपत्रिका किंवा इव्हेंटसाठी वापरणे अयोग्य आहे. समाजसेवा हेच या संस्थेचे ध्येय आहे आणि त्यासाठीच आपण एकत्र आलो आहोत.

डॉ. सोन्या पाटील यांचा भावनिक संदेश:

संस्थेचे संस्थापक धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले,

मला कुठलाही सत्कार नको, हार-तुरे, फलक नकोत. माझा वाढदिवस साजरा करायचा असेल, तर प्रत्येकाने आपल्या भागात गरजू विद्यार्थ्यांना पेन-वही द्यावी, अन्नदान करावे, सेवा करावी - हीच खरी अभिव्यक्ती आहे.

त्यांनी समाजसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीदवाक्य जपताना गेली २४ वर्षे एकही दिवस न थांबता कार्यरत राहिलेल्या संस्थेचा परिचय राज्यभराच्या कार्यकर्त्यांना दिला. या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी:

शैक्षणिक साहित्य वाटप:

दीपावळीपूर्वी आदिवासी भागांत मिठाई, साडी वाटप

आरोग्य शिबिरे:

ॲम्बुलन्स सुविधा

क्रीडा महोत्सवांचे आयोजन

साई पालखी यात्रा (भिवंडी ते शिर्डी)

असे अनेक उपक्रम राबवले जातात.

डॉ. विश्वासराव आरोटे यांचे प्रेरणादायी विचार:

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, समाज कल्याण ही संस्था म्हणजे प्रत्येक कार्यकर्त्याची खरी मातृसंस्था आहे. या महान संस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने या पवित्र साईभूमीत, समाजसेवेच्या रथयात्रेत सहभागी होणाऱ्या आपणा सर्व कार्यकर्त्यांना मी मनापासून नमन करतो!

माझी आजची भूमिका ही केवळ प्रदेश उपाध्यक्ष म्हणून नाही, तर या मातृसंस्थेचा एक जबाबदार शिलेदार म्हणून आहे. मी स्वतःला कधीच 'पदाधिकारी' मानत नाही, मी 'कर्तव्याधिकारी' आहे - आणि तुमच्यासारख्याच एका कार्यकर्त्याने आज ही व्यासपीठावर उभं केलंय.

समाज कल्याण: एक संस्थेपेक्षा अधिक - एक विचार, एक चळवळ!

'समाज कल्याण' ही संस्था म्हणजे केवळ एक पंजीकृत संस्था नाही - ती एक विचारधारा आहे, एक संस्कृती आहे. या संस्थेने गेल्या चोवीस वर्षांत दाखवलेला समाजसेवेचा प्रवास म्हणजे - पायाला चिखल लागला तरी चालेल, पण एखाद्या गरीबाच्या डोळ्यात आनंदाचं पाणी आलं पाहिजे - हाच या संस्थेचा हेतू राहिलाय.

या व्यासपीठावर येणाऱ्या प्रत्येकाने एक गोष्ट लक्षात ठेवावी, या संस्थेची ओळख आपण निर्माण करायची नसते, आपल्या कार्यातून ही संस्था आपली ओळख निर्माण करते!

दुसऱ्याच्या तव्यावर पोळी भाजणं थांबवा!

आज काळ बदलला आहे. सोशल मीडियाच्या युगात काम कमी आणि जाहिरात जास्त झाली आहे. काही लोक दुसऱ्याच्या नावाचा वापर करून स्वतःला पुढे नेण्याचा प्रयत्न करतात. पण मी इथे आज स्पष्ट सांगतो:

दुसऱ्याच्या तव्यावर पोळी भाजणं सोडा!

स्वतःच्या परिसरात, आपल्या विभागात काम करा.

तुम्ही एखाद्या गरीब विद्यार्थ्याला वही दिलीत, एखाद्या शेतकऱ्याला मदत केलीत, एखाद्या आजारी माणसाला रक्त मिळवून दिलं - तर समाज तुमचं नाव घेईल, त्यासाठी बॅनर लागणार नाहीत!

ही संस्था म्हणजे पदासाठी नव्हे, कार्यासाठी आहे

ही संस्था कुणालाही राजकारणासाठी किंवा निवडणुकांसाठी वापरायची नाही.

या संस्थेच्या माध्यमातून जर तुम्ही फक्त पद मिळवण्याचा विचार करत असाल, तर हे व्यासपीठ तुमच्यासाठी नाही. पण जर समाजासाठी काही करायचं ठरवलं असेल, तर ही संस्था तुमच्या पाठीशी अखंड उभी आहे.

समाज कल्याण: आपल्या कामाचं व्यासपीठ:

आपण ज्या पदावर निवडून आलो आहोत, ती एक संधी आहे - ती 'सोने' करण्याची.

या संस्थेच्या माध्यमातून तुम्ही तुमच्या जिल्ह्यात, तालुक्यात, गावात असे उपक्रम राबवा की लोक म्हणतील - 'हो, हा कार्यकर्ता समाज कल्याणचा आहे, आणि तो खरोखर काम करतो!'

मित्रांनो,

पद म्हणजे केवळ एक नाव नाही, ती एक जबाबदारी आहे. आणि जबाबदारी निभावण्याची शक्ती तुमच्या नजरेत असली पाहिजे, तुमच्या कृतीत असली पाहिजे.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, माझी अपेक्षा आणि विनंती आहे तुम्हाला:

१. प्रत्येक कार्यकर्त्याने वर्षातून किमान तीन समाजोपयोगी उपक्रम राबवावेत.

२. शाळकरी मुलांना वह्या, पेन, कपडे, पुस्तकं वाटावीत.

३. मुलींच्या शिक्षणासाठी विशेष मोहिमा राबवा.

४. आरोग्य शिबिरं, रक्तदान, नेत्रतपासणी यासाठी पुढाकार घ्या.

५. कार्य करण्याआधी छायाचित्र काढू नका, आणि काम झाल्यानंतर फोटो आवश्यक वाटत असेल तर घ्या - पण कृतीला प्रथम स्थान द्या.

समाजसेवा हीच ईश्वरसेवा आहे - आणि 'समाज कल्याण' हीच खरी देवपूजा आहे असेही डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले.

कार्यक्रमाचे अन्य वैशिष्ट्ये:

कार्यक्रमाची सुरुवात साईबाबांच्या आरतीने व दीपप्रज्वलनाने झाली.

शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संस्थेचे प्रमुख प्रवर्तक जे.के. पाटील यांनी आभारप्रदर्शन केले.

शेवटी सर्वांना स्नेहभोजन देण्यात आले.

समाज कल्याण न्यास ही केवळ संस्था नाही तर चळवळ आहे. मणसातील माणूसपण जागवणारी, समाजसेवा हीच ईश्वरसेवा मानणारी ही चळवळ आज नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून अधिक व्यापक होत आहे. नव्या कार्यकारिणीमुळे निश्चितच समाजकार्याला नवे बळ, दिशा आणि गती प्राप्त होईल, असा विश्वास सर्वसामान्य कार्यकर्त्यांत व्यक्त होत आहे.

---

# बोळेगाव येथे ग्राम पंचायतीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालूक्यातील बोळेगाव येथिल ग्राम पंचायतीच्या वतीने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचा वर्धापान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी सरपंच विलास पाटील, तंटामुक्त अध्यक्ष प्रकाश सुर्यवंशी,सोसायटीचे चेअरमन दादाराव काळे,भाजपा नेते अंगद जाधव आदींच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिचे पुजन करून सरपंच विलास पाटील यांच्या हस्ते भगव्या ध्वजाचे ध्वजारोहन करून मिठाईचे वाटप करण्यात आले.



यावेळी ग्रा प.सदस्य सुनिल सुर्यवंशी, पवन सुर्यवंशी, पोलीस पाटील कडाजी सुर्यवंशी, दत्तात्र्य साळूंके, पप्पु चव्हाण, महादेव काळे, लक्ष्मण रुपनुर,पंडित भोसले, दत्ता बनसोडे,सामाजिक कार्यकर्त्या संगीता सुरवसे सह ग्रामस्थ,महिला, युवा कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

---

# एखादी व्यक्ती पक्षातून गेली म्हणून पक्ष संपत नाही, आम्ही नव्याने आणि जोमाने तालुक्यात कॉँग्रेस पक्ष उभा करु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या शिवसेना प्रवेशानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला जाईल विधानसभेला कॉग्रेसपक्षाला सुमारे एक लाख मतदान झाले ही कॉग्रसची ताकद विसरता येणार नाही स्वातंत्र्या नंतर आज पर्यंत ११वेळा कॉग्रेसपक्षाला यश मिळाले आहे.



जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष अरुण जाधव म्हणाले, कॉग्रेसपक्षाने अनेक वादळे पचवली आहेत लोक येतात जातात पक्ष संपत नाही संपणार नाही.मी पक्षातच राहणार आहे.सर्व प्रथम मी भूमिका जाहीर केली होती माझ्या भूमिकेचे स्वागत खासदार प्रणिती शिंदे यांनी केले असे सांगितले.

### माजी नगराध्यक्षा डॉ. सुवर्णा मलगोंडा यांनी पत्रकार परिषदेत केले प्रतिपादन

डॉ सुवर्णा मलगोंड म्हणाल्या कॉंग्रेसपक्षाने मला नगराध्यक्ष केले महिला जिल्हाध्यक्षा केले माझी आई श्रीमती पार्वती मलगोंडा यांना मंत्रिपद दिले याची जाणीव आहे राजकीय वारे फिरले म्हणून मी बदलणार नाही. कॉंग्रेसला वाऱ्यावर सोडणार नाही. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील कॉंग्रेसची घडी बसवणार.

या वेळी जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील म्हणाले. आगामी काळात शहर आणि तालुक्यातील कार्यकर्त्यांनी बैठक घेण्यात येणार आहे . आता कॉंग्रेस संकटात असली तरी भविष्यकाळ उज्ज्वल आहे. तीकडे गेलेले कॉंग्रेसजन आमच्या संपर्कात आहेत.

---

# ध्येय निश्चितीसाठी सर्वस्व पणाला लावावे : प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : गरिबीत शिक्षण घेताना परिश्रमपूर्वक अभ्यास केल्यास होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था पुढे येतात. स्पर्धेच्या युगात गुणवत्ता व कौशल्याच्या बळावर मोठमोठी अधिकारपद प्राप्त होऊ शकतात म्हणून विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून त्याच्या प्राप्तीसाठी सर्वस्व पणाला लावावे असे प्रतिपादन कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी केले.

रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय मुला मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित केला होता त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल, सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, रोटरी क्लबचे सचिव आदर्श गोयदानी, खजिनदार अल्पेश साबू, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. येळेगावकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या परिस्थितीचा बाऊ करता कामाने. त्या परिस्थितीवर मात करून शिक्षण घ्यावे. मुलांनी उच्चशिक्षित बनावे. शिक्षणासोबत खेळात ही प्रावीण्य मिळवावे. शिक्षणानेच संपत्ती कमवता येते असे नाही याचे ज्वलंत उदाहरण रघुनाथ माशेलकर, बुद्धिबळ पटू गुकेश डोम्माराजू, राजस्थान रॉयल्सचा



क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी आदी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा.

शेवटी मान्यवरांच्या हस्ते ३० शालेय विद्यार्थ्यांना वह्या व पेनसेट भेट देण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले

---

## ५० झाडे लावा, झाडे जगवा; चलबुर्गा ग्रामपंचायतीचा कर माफीचा निर्णय

## सरपंच काशिराम परिहार यांची घोषणा

# एडीएमची शाश्वत शेतीसाठी बीज प्रक्रिया आणि वृक्ष लागवडीचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : चलबुर्गा (ता. औसा, जि. लातूर) येथे एडीएम ॲग्रो इंडस्ट्रीज, लातूर, बायर फूड चेन, पुणे आणि गोअमृत शेतकरी उत्पादक कंपनी, चलबुर्गा यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत शेती उपक्रम २०२५-२६ अंतर्गत बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक व मार्गदर्शन कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चलबुर्गा ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. काशीराम पंडितराव परिहार यांनी भूषविले, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून एडीएम ॲग्रोचे व्यवस्थापक श्री. अमोल धवन आणि बायर फूड चेनचे मार्केटिंग व्यवस्थापक श्री. गणेश साळुंखे उपस्थित होते.

कार्यक्रमात श्री. गणेश साळुंखे यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन पिकावरील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी बीज प्रक्रिया कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखवले. बीज प्रक्रिया केल्याने पीक उत्तम उगम घेते, रोगप्रतिकारकता वाढते व उत्पादनात वाढ होते याकडे त्यांनी लक्ष वेधले. शेतकऱ्यांनी बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी असे आवाहन त्यांनी केले.

श्री. अमोल धवन यांनी शाश्वत शेतीत जैवविविधता जपण्याचे महत्त्व, वृक्ष लागवड, बदलते हवामान व रस्ते सुरक्षा यावर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांना शेताच्या बांधावर व मोकळ्या जागांमध्ये स्थानिक व उपयुक्त वृक्षांची लागवड करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात सरपंच श्री. काशीराम परिहार यांनी एक महत्त्वपूर्ण घोषणा करत सांगितले की, ज्यांनी ५० वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन केले असेल, अशा शेतकऱ्यांना ग्रामपंचायतीकडून कर माफ केला जाईल. ही घोषणा ग्रामस्थ व शेतकरी बांधवांकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आली.

गावातील प्रगतशील व शाश्वत शेती करणारे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एडीएम ॲग्रोकडून श्री. महादेव पवार व श्री. किशोर मोरे आणि गोअमृत शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक. त्र्यंबक पवार, ज्ञानेश्वर मोरे, रामेश्वर मोरे, बायर फूड चेनकडून श्री. रोहित बिराजदार यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमाच्या शेवटी एडीएम ॲग्रोचे श्री. बिभीषण शिंगारे यांनी आभार व्यक्त केले.